सकाळ

# गाडगीळ, अवचट, पाचर्णेंना टिमविची डी.लिट.

**पुणे, ता. ११ :** ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ डॉ. माधव गाडगीळ, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. अनिल अवचट आणि ललित कला अकादमीचे अध्यक्ष उत्तम पाचर्णे यांना टिळक महाराष्ट्र विद्यापीठातर्फे डी. लिट. पदवी देण्यात येणार आहे. या संदर्भातील घोषणा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दीपक टिळक यांनी सोमवारी केली. पदवीप्रदान कार्यक्रम शनिवारी (ता. १६) सकाळी पावणेदहा वाजता होईल.



**माधव गाडगीळ**



**अनिल अवचट**



**उत्तम पाचर्णे**

गाडगीळ यांनी पर्यावरण रक्षणासाठी महत्त्वपूर्ण काम केले आहे. पश्चिम घाटातील जैवविविधतेबाबत त्यांनी तयार केलेला अहवाल हा महत्त्वपूर्ण ठरला आहे. देशातील जैवविविधतेतील शास्त्रशुद्ध पद्धतीने केलेली नोंदणी हे डॉ. गाडगीळ यांचे बहुमोल योगदान ठरले आहे. डॉ. अवचट यांनी आपल्या लेखनातून उपेक्षित घटकांचे प्रश्न मांडले आहेत. 'माणसं', 'वाघ्या-मुरळी', 'कोंडमारा' ही त्यांची पुस्तके समाजाचे वास्तव चित्र लोकांसमोर मांडतात.

पान ३ वर »

Pune, Pune-Today
12/02/2019 Page No. 1

## गाडगीळ, अवचट, पाचर्णेंना टिमविची डी.लिट.

» पान १ वरून

व्यसनमुक्तीसाठी मुक्तांगण केंद्राच्या माध्यमातून त्यांनी बहुमोल योगदान दिले आहे. त्याचबरोबर चित्रकार आणि शिल्पकार असलेले उत्तम पाचर्णे यांना महाराष्ट्र गौरव पुरस्कार, राष्ट्रीय ललित कला पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. त्यांनी कलाक्षेत्रात योगदान दिले आहे.

या तिघांना आपापल्या क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल डी. लिट पदवीने गौरविण्यात येणार आहे; तसेच या प्रसंगी ७६ विद्यार्थ्यांना पीएचडी पदवी; तर १२ विद्यार्थ्यांना एम. फिल. पदवी दिली जाणार आहे. कौशल्य विकास शाखेच्या २२६ विद्यार्थ्यांना, पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या ४५६६ विद्यार्थ्यांना पदवीप्रदान केली जाणार आहे.